ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २०३ • सोमवार दि.११ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# पंतप्रधानांच्या आवाहनानंतर देशात आरोप-प्रत्यारोपांची झडी

## जबाबदारीने वागणे आवश्यक -मुख्यमंत्री फडणवीस



जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे तेल व गॅस पुरवठ्यावर ताण निर्माण झाला असून, भारताने सावधगिरीने पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मोदींच्या या वक्तव्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप नेत्यांनी समर्थन दिले. देश संकटाच्या काळातून जात असताना नागरिकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे, असे मत भाजप नेत्यांकडून व्यक्त करण्यात आले. केंद्र सरकार परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचा दावा सत्ताधाऱ्यांनी केला. देशहितासाठी केलेल्या आवाहनाचे राजकारण केले जात आहे, असा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह भाजप पान ४ वर

## सत्ताधारी-विरोधक आमने सामने



नवी दिल्ली:देशातील नागरिकांनी वर्षभर सोने खरेदी करु नये, इंधन बचत करावी असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्यानंतर देशभरात यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने येवून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडत आहेत. समाज माध्यमांवर नेटकऱ्यांनी परस्पर विरोधी कमेंटस करुन धूम उडवून दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी हैद्राबाद येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी आखाती देशांतील तणाव, वाढते इंधनदर आणि जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर देशवासीयांना इंधन बचत, काटकसर आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराचे आवाहन केल्यानंतर देशातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मोदींच्या वक्तव्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोपांची झड सुरू झाली असून, या मुद्द्यावरून राजकीय संघर्ष अधिक तीव्र होताना दिसत आहे. पंतप्रधान मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करणे, परदेश प्रवास टाळणे, वर्क फ्रॉम होमला प्राधान्य देणे, परकीय उत्पादनांची खरेदी कमी करणे आणि पुढील एक वर्ष सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केले होते. देशहितासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.

### समाज माध्यमांवर प्रतिक्रियांचा पूर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वक्तव्यानंतर फेसबुक, व्हॅटसअप, पान ४ वर

## ही तर अपयशाची कबुली -राहुल गांधी



काँग्रेससह विरोधकांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदींचे आवाहन म्हणजे सरकारच्या अपयशाची कबुली असल्याचे म्हटले. १२ वर्षांच्या कारभारानंतर जनतेला काय खरेदी करावे आणि काय टाळावे हे सांगण्याची वेळ आली आहे. सरकार स्वतःची जबाबदारी झटकून ती जनतेवर ढकलत आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना भाजप नेत्यांनी काँग्रेसवरच निशाणा साधला. दरम्यान, मोदींच्या वक्तव्यानंतर सोशल मीडियावरही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी पंतप्रधानांच्या आवाहनाला पान ४ वर

# धर्मांतर प्रकरणात निदा खानला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

नाशिक:टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांच्या कथित लैंगिक शोषण आणि धर्मांतराच्या प्रयत्नप्रकरणी मुख्य संशयित निदा खान हिला नाशिकरोड न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर तिला सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. या प्रकरणाच्या संवेदनशीलतेमुळे न्यायालय परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

निदा खान गरोदर असल्यामुळे तिला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर केले जाईल, अशी चर्चा होती. मात्र, पोलिसांनी तिला प्रत्यक्ष न्यायालयात हजर केले. सुनावणीदरम्यान कोणताही मोठा युक्तिवाद झाला नाही. तसेच पोलिसांकडून वाढीव पोलीस कोठडीची ठोस मागणी करण्यात आली नसल्याचेही दिसून आले. गरोदरपणाचा विचार करूनच पोलिसांनी पुढील पोलीस कोठडी न मागितल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, पाच दिवसांच्या



पोलीस कोठडीत निदा खान तसेच तिच्या कुटुंबीयांची सखोल चौकशी करण्यात आली. न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर आता तिची रवानगी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात करण्यात येणार आहे.या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांच्या हाती काही धक्कादायक माहिती लागल्याचा दावा करण्यात आला आहे. तपासात निदा खान पीडितेच्या घरी जाऊन धार्मिक विधी करत असल्याचे समोर आले आहे. तसेच पीडितेला विशिष्ट धर्माची प्रार्थना, धार्मिक शिक्षण आणि पोशाख स्वीकारण्यास भाग पाडल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.पोलिस तपासात पीडितेला धार्मिक विषयांशी संबंधित तब्बल १७१ लिंक पाठवण्यात आल्याचे उघड झाले आहे.

# युद्धाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार हायअलर्ट

## राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठक

नवी दिल्ली:पश्चिम आशियात वाढत चाललेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने देशातील ऊर्जा व अत्यावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याबाबत सतर्कता वाढवली आहे. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी महत्त्वपूर्ण मंत्रिगट बैठक पार पडली. जवळपास दीड तास चाललेल्या या बैठकीत देशातील इंधनसाठा, खतांचा पुरवठा आणि पुरवठा साखळीची स्थिती यावर सविस्तर चर्चा करुन उच्चस्तरीय आढावा घेण्यात आला.



केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली बोलविलेल्या बैठकीला केंद्रीय आरोग्य व रसायन-खते मंत्री जे. पी. नड्डा, पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंह पुरी, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पश्चिम आशियातील संघर्षाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर आणि आयात-निर्यातीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा आढावा यावेळी घेण्यात आला.विशेषतः कच्च्या तेलाच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय दरांचा देशातील पेट्रोल, डिझेल व एलपीजीच्या किमतींवर होणारा परिणाम तपासण्यात आला. तसेच खतांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक पान ४ वर

# देशावरील संकट हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचा नाकर्तेपणा व बेफिकीरवृत्तीचा परिपाक-सपकाळ

मुंबई/प्रतिनिधी-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला पेट्रोल-डिझेल, सोने खरेदी, खतांचा वापर व खाद्यतेलाच्या वापरावर केलेला उपदेश म्हणजे देश चालवण्यास कॉम्प्रमाइज्ड पंतप्रधान सपशेल फेल ठरल्याचे द्योतक आहे. जनतेला त्याग करण्याचा नाहक सल्ला व उपदेश दणारे मोदी व त्यांचे सहकारी मात्र कोट्यवधी रुपयांची उधळण करत आहेत. सगळा त्याग जनतेने करायचा आणि नरेंद्र मोदी फक्त कॅमेऱ्यासमोर भाषण देत फिरणार



का ? असा संतप्त प्रश्न विचारून, प्रचारमंत्री नरेंद्र मोदी यांनीच राष्ट्रहितासाठी त्याग करत वानप्रस्थाश्रमाकडे मार्गस्थ व्हावे, ही १४० कोटी जनतेची भावना आहे, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विधानाचा समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, जेव्हा जगातील इतर देश संभाव्य संकटासाठी नियोजन आणि तयारी करत होते तेव्हा प्रचारमंत्री नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्ष फक्त निवडणुका, जाहिराती, धर्मांधता आणि द्वेषाचे राजकारण करण्यात मग्न होते. नरेंद्र मोदी यांच्या निष्काळजीपणाची, अहंकारी,लहरी कारभाराची मोठी किंमत देशातील नागरिकांना मोजावी लागत आहे.

# महिलेच्या पर्समधून दीड लाख रुपये लंपास

नांदेड/प्रतिनिधी-महिलेच्या पर्समधून दीड लाख रुपये चोरी झाल्याची घटना शनिवारी सकाळी वजिराबाद भागात घडली आहे.

सध्या लग्न सोहळ्याच्या तिथी असल्याने बाजारपेठेत नागरिकांची खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. नांदेड शहरातील बाजारपेठेत ग्रामीण भागातूनही नागरिक सकाळपासूनच खरेदीसाठी येत आहेत. शहरातील गोकुळनगर भागात राहणाऱ्या सौ.कावेरी बद्रीनाथ देवबाणे (वय ४०) ह्या शनिवारी सकाळी खरेदीसाठी बाजारपेठेत गेल्या होत्या. मल्टीपर्पज ते किंग कलेक्शन दरम्यान अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेवून कावेरी देवबाणे यांच्या पर्समधील दीड लाख रुपये लंपास केले आहेत. पैसे चोरीला गेल्याने देवबाणे यांना चांगलाच धक्का बसला. याप्रकरणी त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वजिराबाद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार बुलंगे हे करीत आहेत.

# बनावट कागदपत्राच्या आधारे शेतीवर कब्जा करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-मौजे पिंपळगाव महादेव शिवारात बनावट कागदपत्राच्या आधारे शेतीवर कब्जा करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पंधरा ते वीस जणांविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतुल मोहनराव पवार रा.एचआयजी कॉलनी,नांदेड यांची अर्धापूर तालुक्यातील मौ.पिंपळगाव महादेव शिवारात शेती आहे. शनिवारी सायंकाळी अतुल पवार यांचा भाऊ शेतात असतांना त्या ठिकाणी रेखा धिरज पवार, धिरज कुंदन पवार, आशिष चारभाई, सागर कोवला रा.मलकागुंडा तांडा ता.माहूर, गणेश वैजनाथ रुपके रा.विशालनगर,नांदेड, मनमिंदरसिंघ उर्फ मॉटीसिंघ जहागिरदार रा.नांदेड, विठ्ठल घोडगे रा.नांदेड व इतर आठ ते दहा जण हे आले. त्यांनी पवार यांना तुमची जमीन आम्ही सौदाचिठ्ठी करुन खरेदी केली आहे. जमीनीचा ताबा घेण्यासाठी आलो आहोत, असे म्हणून शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. पवार यांच्या जमिनीची किंमत १२ कोटी रुपये पेक्षा जास्त असतांना बनावट कागदपत्र तयार करुन शेत जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला. अतुल पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अर्धापूर पोलीस ठाण्यात वरील आरोपी विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनी ढेमकेवाड हे करीत आहेत.

# किनवट-माहूर राष्ट्रीय महामार्गाची अक्षरशः चाळण;वाहनधारकांचा जीव धोक्यात

## कोट्यवधी खर्चाचा दर्जा कुठे गेला?नागरिकांचा संताप



माहूर/प्रतिनिधी-तेलंगणा आणि विदर्भाला जोडणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय राज्य मार्ग क्रमांक १६१ ची अक्षरशः चाळण झाली असून किनवट-माहूर मार्गावर ठिकठिकाणी पडलेल्या मोठ-मोठ्या भेगांनी रस्ते बांधकामाच्या गुणवत्तेचा बुरखा फाडला आहे. उमरा फाटा, असोली फाटा, गोंडवाडसा ते पालाइगुडा फाट्यापर्यंत रस्त्याची दयनीय अवस्था पाहून वाहनधारक संताप व्यक्त करीत आहेत.

विशेष म्हणजे, अवघ्या वर्ष दोन वर्षा पूर्वी पूर्ण झालेल्या या रस्त्यावर एवढ्या मोठ्या प्रमाणात तडे जाणे म्हणजे निकृष्ट दर्जाच्या कामाचे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. मागील तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेले महामार्गाचे काम अजूनही अपूर्णच असताना आता रस्ताच उखडू लागल्याने नेमकं काम झालं तरी काय? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. दररोज हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या महामार्गावरून प्रवास करताना दुचाकीस्वारांना अक्षरशः जीव मुठीत धरून जावे लागत आहे. अनेक ठिकाणी रस्त्याला पडलेल्या खोल भेगा आणि उखडलेल्या भागांमुळे किरकोळ अपघातांची मालिका सुरू झाली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी हा प्रवास अधिक धोकादायक बनला आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून तयार केलेला रस्ता काही महिन्यांतच उखडतो, ही केवळ निष्काळजीपणा नसून सरळसरळ भ्रष्टाचाराची निशाणी आहे, अशा तीव्र शब्दांत नागरिकांनी संताप व्यक्त केला. रस्ता बांधकाम करणाऱ्या गुत्तेदारासह संबंधित महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांवरही दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे.

इतक्या कमी कालावधीत रस्त्याला भेगा पडत असतील, तर कामाचे मापदंड, वापरलेले साहित्य आणि अधिकाऱ्यांची देखरेख यावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. जनतेच्या जीवाशी खेळ करून निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यांवर कारवाई होणार की नाही? असा सवाल आता सर्वसामान्य जनता उपस्थित करीत आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित गुत्तेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. एकंदरीत, किनवट-माहूर राष्ट्रीय महामार्गावरील पडलेल्या भेगांनी बोगस कारभाराचा पडदा फाडला असून प्रशासनाने आता तरी जागे होऊन नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी तीव्र भावना जनतेतून व्यक्त होत आहे.


# सोने,सरकार आणि जनतेतील संभ्रम

''यहाँ डाल-डाल पर सोने की चिड़िया करती है बसेरा''हे गीत भारताच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतीक मानले जाते. एकेकाळी संपन्नता, संस्कृती आणि नैसर्गिक साधनसंपत्तीमुळे भारताला ''सोने की चिडिया'' म्हणून ओळखले जात होते. आजही भारतीय समाजात सोन्याला केवळ मौल्यवान धातू म्हणून नव्हे, तर सुरक्षितता, परंपरा आणि प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळेच सोन्याशी भारतीयांचे नाते हे आर्थिकपेक्षा अधिक भावनिक आहे. मात्र अलीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही काळ सोन्याची खरेदी टाळावी, असे सूचक आवाहन केल्याने देशभरात नव्या चर्चांना तोंड फुटले आहे.सामान्य नागरिकांच्या मनात लगेचच २०१६ च्या नोटाबंदीची आठवण ताजी झाली. सरकार पुन्हा एखादा मोठा आर्थिक निर्णय घेणार का? सोन्यावर निर्बंध येणार का? देश आर्थिक अडचणीत तर नाही ना? अशा शंका व्यक्त होऊ लागल्या. कारण भारतीय नागरिकांनी गेल्या काही वर्षांत अनेक आर्थिक चढउतार अनुभवले आहेत. त्यामुळे सरकारकडून सोन्यासंदर्भात कोणतेही वक्तव्य आले की नागरिक अधिक सावध होतात. विशेषतः भारतासारख्या देशात, जिथे सोनं हे केवळ गुंतवणूक नसून सामाजिक सुरक्षिततेचे साधन आहे, तिथे अशा विधानांचे दूरगामी परिणाम होणे स्वाभाविक आहे.आज सोन्याच्या किंमती विक्रमी पातळीवर पोहोचल्या आहेत. एकेकाळी काही हजारांत मिळणारे तोळाभर सोनं आज लाख रुपयांच्या घरात पोहोचले आहे. त्यातच सोन्याच्या खरेदीवर ३ टक्के जीएसटी आणि दागिन्यांच्या मेकिंग चार्जवर ५ टक्के कर आकारला जातो. त्यामुळे सामान्य ग्राहकांवर मोठा आर्थिक ताण पडत आहे. तरीदेखील सोन्यावरील भारतीयांचा विश्वास कमी झालेला नाही. आर्थिक अस्थिरता, शेअर बाजारातील चढउतार किंवा जागतिक मंदीच्या काळातही लोक सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणूनच पाहतात. याच कारणामुळे पंतप्रधानांचे आवाहन अनेकांना धक्कादायक वाटले. प्रत्यक्षात सरकारचा उद्देश आयात कमी करणे, परकीय चलनाचा ताण नियंत्रित ठेवणे किंवा आर्थिक संतुलन साधणे हा असू शकतो. कारण भारत मोठ्या प्रमाणावर सोन्याची आयात करतो आणि त्याचा परिणाम व्यापार तुटीवर होतो. जागतिक बाजारात सोन्याच्या वाढत्या किंमतीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर अतिरिक्त दबाव निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी काही काळ संयम बाळगावा, असा संदेश सरकार देत असावे. मात्र सरकारने याबाबत स्पष्ट भूमिका मांडली नाही, तर अफवा आणि भीतीचे वातावरण निर्माण होणे अपरिहार्य ठरते.भारतीय समाजात सोन्याचे स्थान इतके मजबूत आहे की, त्यावर पूर्णपणे निर्बंध आणणे कोणत्याही सरकारसाठी व्यवहार्य नाही. लग्न समारंभ, धार्मिक विधी, सण-उत्सव आणि बचतीची मानसिकता या सर्वांमध्ये सोनं खोलवर रुजलेले आहे. ग्रामीण भागात तर सोनं हे अनेकदा बँकेपेक्षा अधिक विश्वासार्ह संपत्ती मानले जाते. त्यामुळे सोन्याच्या खरेदीबाबत कोणताही सरकारी संकेत दिला जात असेल, तर त्याची पारदर्शक माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे.उलट सरकारने सोन्यावरील कररचना कमी करण्याचा विचार करायला हवा. जीएसटीचा बोजा कमी झाला तर सामान्य ग्राहकांना दिलासा मिळू शकतो. तसेच अवैध मार्गाने होणारी सोन्याची तस्करीही आटोक्यात आणता येईल. आज अनेक लोक डिजिटल गोल्ड किंवा इतर गुंतवणुकीच्या पर्यायांकडे वळत असले, तरी प्रत्यक्ष सोन्याबाबतचा विश्वास अजूनही अबाधित आहे. ''सोने की चिडिया''ही केवळ ऐतिहासिक उपमा नाही, तर भारतीय मानसिकतेचे प्रतीक आहे. म्हणूनच सोन्या संदर्भात सरकारने घेतलेले प्रत्येक पाऊल अत्यंत संवेदनशीलतेने उचलणे आवश्यक आहे. आर्थिक धोरणे महत्त्वाची असली तरी जनतेच्या भावना आणि विश्वास यांचाही विचार तितकाच महत्त्वाचा आहे. सरकारने स्पष्टता ठेवली, तर संभ्रम दूर होईल; अन्यथा सोन्याभोवती निर्माण झालेली भीती अधिक वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## नांदेडच्या मातीतून उमललेला संविधानिक आशावाद

# पुस्तक परीक्षण: ''मुसलमानों का सियासी अजेंडा''

नांदेड ही फुले-शाहू-आंबेडकर चळवळीची, दाभोळकर-पानसरे यांच्या विचारांची आणि सामाजिक संघर्षाची भूमी आहे. याच भूमीतून तीन दशकांच्या सार्वजनिक जीवनातून घडलेलं एक पुस्तक आता वाचकांसमोर आलं आहे. मुसलमानों का सियासी अजेंडा हे केवळ भाषणांचा संग्रह नाही, तर नांदेडच्या गल्ली-बोळात, सभांमध्ये आणि आंदोलनांमध्ये तयार झालेला संविधानिक लढाईचा आराखडा आहे.




**तीन दशकांचा नांदेड अनुभव :**

लेखक फारुक अहमद हे नांदेडचे रहिवासी आहेत. डॉ. नरेंद्र दाभोळकर आणि कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या चळवळीतून त्यांनी कामाला सुरुवात केली. त्यानंतर कम्युनिस्ट चळवळ, आम आदमी पार्टी आणि २०१९ पासून वंचित बहुजन आघाडी या टप्प्यांमधून त्यांनी मुस्लिम समाजासह बहुजनांच्या प्रश्नांना राजकीय पटलावर मांडलं. २०१९ आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुका त्यांनी नांदेडमधून लढवल्या.

या तीन दशकांत फारुक अहमद यांनी नांदेडमध्ये छोट्या-मोठ्या अनेक आंदोलनांची धुरा सांभाळली. वक्फ जमिनींच्या अतिक्रमणाचा प्रश्न, दलित-आदिवासींवर होणारे अन्याय, खेतमजूरांच्या किमान वेतनाचा लढा, शेतकरी आत्महत्यांनंतर कुटुंबांना मदत, पोलीस कोठडीतील अत्याचार, महिलांवरील हिंसाचार अशा अनेक मुद्द्यांवर ते रस्त्यावर उतरले. मुस्लिम समाजातील पसमांदा, हातमाग कामगार, रिक्शा चालक, मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबांच्या अडचणीत ते नेहमीच मदतीला धावून गेले. त्यामुळे हे पुस्तक केवळ विचारांचा संग्रह नसून, नांदेडच्या जमिनीवर झालेल्या लढाईंचा दस्तऐवज आहे.

**नांदेडचा राजकीय वारसा आणि आशावाद :**

नांदेडमध्ये मुस्लिम समाजाला राजकीय नेतृत्वाची परंपरा आहे. १९७८ मध्ये नूरल्ला खान नांदेडमधून विधानसभेवर निवडून आले होते. तर १९६२ ते १९७७ या काळात फारूक पाशा यवतमाळमधून विधानपरिषद सदस्य आणि विधानसभा सदस्य म्हणून काम पाहिले. वसंतराव नाईक यांच्या सरकारमध्ये त्यांनी मंत्रीपदही भूषवले. हे दोन्ही नेते सामाजिक चळवळीतून समोर येऊन राजकारणात यशस्वी झाले.

त्यांचा राजकीय विचार आणि संघर्षाचा मार्ग घेऊनच फारुक अहमद यांनी आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली. मुसलमान आमदार होऊ शकतो, मुस्लिम समाजाचा कार्यकर्ता विधानमंडळात जाऊ शकतो हा सकारात्मक आशावाद नांदेडच्या मुस्लिम समाजात जागृत करण्यासाठी फारुक अहमद आजही नूरल्ला खान आणि फारूक पाशा यांचे संदर्भ देऊन जनजागृती करतात. हे पुस्तक त्याच आशावादाचा विस्तार आहे. नूरल्ला खान आणि फारूक पाशा यांनी दाखवून दिलेल्या मार्गावर, संविधानिक आणि बहुजन एकजुटीच्या राजकारणाने पुढे जायचं, हा संदेश पुस्तकाच्या प्रत्येक पानावर उमटतो.

**गोविंद दळवी**
राज्य उपाध्यक्ष,
वंचित बहुजन आघाडी,नांदेड.

**पुस्तकाचा मुख्य सूर :**

पुस्तकाचा मुख्य मुद्दा सरळ आहे - मुस्लिम समाजाने आता जज्बाती नाऱ्यांमधून बाहेर पडून, संविधानिक आणि बहुजन एकजुटीच्या राजकारणात सहभागी व्हावं. जुल्म पॉलिटिकल, तो हल भी पॉलिटिकल! हे वाक्य संपूर्ण ग्रंथाचा गाभा आहे. लेखकाने एससी, एसटी, ओबीसी, पसमांदा, आदिवासी, खेतमजूर यांच्या सामूहिक लढाईत मुस्लिम समाजाने सहभागी होण्याचा आग्रह धरला आहे.

नांदेडसारख्या भागात मुस्लिम समाज राजकीयदृष्ट्या मागास आहे, ही वस्तुस्थिती लेखकाने पुस्तकात अनेकदा मांडली आहे. त्यासाठी त्यांनी वंचित बहुजन आघाडीला नवी उम्मीद मानलं आहे. कारण ती मजहब, जात आणि तबके यांच्या पलीकडे जाऊन घटनात्मक लढाईला संधी देते. कॉमन सिव्हिल कोड, पर्सनल लॉ, वक्फ यांसारख्या प्रश्नांवर भावनिक प्रतिक्रियेऐवजी संवादाधारित राजकारणाची गरज त्यांनी स्पष्ट केली आहे.

**दस्तऐवजीय मांडणी:**

पुस्तकात २५ प्रकरणं आहेत. साहब, बीबी और गुलाम की सियासत पासून सीए-एनआरसी, फिलिस्तीन के हक में, जम्हूरियत बचाने की लड़ाई अशा विषयांवर भाषणं आहेत. प्रत्येक भाषणाची तारीख, शहर आणि व्यासपीठ दिल्यामुळे हे पुस्तक केवळ वाचनीयच नाही, तर भविष्यातील संशोधकांसाठीही संदर्भग्रंथ ठरतो.

प्रस्तावनेत ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे की, मुस्लिम जर बहुजनांशी जोडले गेले, तर ते केवळ एक समुदाय राहणार नाहीत, तर संविधानाच्या रक्षणाची परिवर्तनकारी शक्ती बनतील. हा विचार नांदेडसह संपूर्ण मराठवाड्यातील तरुण कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाचा आहे.

तक़दीर सड़कों पर चिल्लाने से नहीं, बल्कि हर मैदान में समझदारी से लड़ने से बदलेगी हा संदेश शिक्षित मुस्लिम तरुणांसाठी दिशादर्शक आहे. सियासत इंसाफ से शुरू हो, तर ती इबादत बनते.

**नांदेडसाठी महत्त्व :**

गोदावरीच्या तीरावरून उठले प्रश्न आणि दिल्लीच्या संसदेपर्यंत पोहोचणाऱ्या संविधानिक चिंता यांच्यातील दुवा हे पुस्तक साधते. नूरल्ला खान आणि फारूक पाशा यांचा वारसा पुढे नेणाऱ्या या पुस्तकात, नांदेडच्या मुस्लिम समाजासाठी राजकीय दिशा आणि आत्मविश्वास दोन्ही आहेत. स्थानिक वाचकांनी, कार्यकर्त्यांनी, विद्यार्थ्यांनी आणि राजकीय अभ्यासकांनी हे पुस्तक आवर्जून वाचावं.

लेखक:फारुक अहमद इक्बाल अहमद
प्रकाशक:प्रबुद्ध भारत मीडिया हाऊस, पुणे
पृष्ठ:२७९
किंमत:२५०

# आईविना जग नाही;वडीलांविना आधार नाही!



प्रेम व निस्वार्थ मायेचा वटवृक्ष म्हणजेच माय! आईचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारला मातृदिन (मदर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी मातृदिन १० मे रविवारी झाला. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते.या जगात माय-बापा शिवाय कोणीही मोठा नाही. आई-वडील,माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही. कारण आई-वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी व जीवजंतू या शब्दाशी निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार,संस्कृती, जडणघडण, रहनसहण, खानपान सर्वत्र दिसून येते.ज्याप्रमाणे आई - वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची(मुलांची)जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात.ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही हेही तितकेच सत्य आहे.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते.

आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई-वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.आईचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजे.परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी मातृदिनला महत्व आहे.पितृ दिन असो किंव्हा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात यात यत्किँचितही फरक नाही.फक्त जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात त्यामुळे मुल-मुली यांच्या केसालाही धक्का लागणार नाही याची काळजी नेहमी घेऊन तत्परता दाखवित असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात १९०८ साली अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली व अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत.मातृत्व दिन(मदर डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला सुध्दा तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी,आत्या इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी-पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे आई-वडिलांच नात. वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते पदोपदी मुलांची काळजी घेऊन जोपासना करते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल आईला कळत-नकळत कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की आकाश पाताळ एक करते.परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यानंतरच जेवण करीत असते. आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न-भूतो- न- भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक-तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते.कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच आहे त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आई विना जग नाही आणि वडीलां विना आधार नाहीआपल्याला थोडीशी जरी इजा किंव्हा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किँचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणी-ना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात.म्हणजेच वडील तीथे नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक मातृदिन दीसुन येईल.माझ्यामते मातृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा?दररोज साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई- वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.मातृदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीच जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी, आजोबा,काका, काकु,मामा,मामी, मावशी,आत्या इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे.त्यामुळे अंकल-न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे.त्याचबरोबल मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मानच अवश्य होईल असे मला वाटते.सध्याच्या काळात काही मुल-मुली आई-वडिलांची सेवा करण्यास असमर्थ दिसून येतात अशा परिस्थितीत आई-वडिलांना वृध्दाश्रमाच्या खाईत लोटतात हेही आई-वडिलांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.परंतु असे व्हायला नको असे मला वाटते.आई या शब्दाला इतके महत्त्व आहे की, स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारीयावरून आपण समजू शकतो की आई या शब्दात किती मोठी अफाट माया व शक्ती आहे.आपण मे ला मातृदिन (मदर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने दिवसेंदिवस हवामानात बदल होत आहे.याकरीता जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.जय हिंद.

**रमेश लांजेवार**
नागपूर.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# निष्पाप मजुराच्या मृत्यूला जबाबदार कोण ?

## माहूरातील कन्स्ट्रक्शन साईट दुर्घटना;खरा चालक दुसराच असल्याचा संभाषण क्लिपमधून दावा

माहूर/प्रतिनिधी- तालुक्यातील मौजे जुनापाणी परिसरात राष्ट्रीय महामार्गावरील पुलाच्या बांधकामा दरम्यान झालेल्या भीषण अपघाताने आता नवे वळण घेतले असून, या प्रकरणात केवळ निष्काळजीपणाच नव्हे तर खऱ्या आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. जेसीबी ऑपरेटर अजित यादव (रा. झारखंड) यांच्या मृत्यूनंतर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, ज्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला त्याचा घटनेशी संबंधच नव्हता, असा दावा समोर आलेल्या संभाषण क्लिपमधून होत आहे.

दि.१ मे च्या मध्यरात्री जुनापाणी परिसरातील कन्स्ट्रक्शन साईटवर माती टाकण्याचे काम सुरू असताना हायवाच्या धडकेत अजित यादव खाली पडले आणि मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृताच्या भावाच्या तक्रारीवरून अजय रामदास मलगाम (रा.गोकुळ गोंडेगाव, ता. माहूर) याच्याविरुद्ध निष्काळजीपणाने मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, आता आमच्या प्रतिनिधीकडे उपलब्ध झालेल्या कथित संभाषण क्लिपमुळे संपूर्ण प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. दोन चालकांमधील संभाषणात ज्याच्यावर गुन्हा दाखल झाला तो प्रत्यक्षात गाडी चालवत नव्हता, असा उल्लेख करण्यात आल्याचे समजते. तसेच, अपघातावेळी वाहन चालवणाऱ्या व्यक्तीकडे जड वाहन चालविण्याचा वैध परवानाच नसल्याची धक्कादायक माहितीही चर्चेतून पुढे येत आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, कंपनीच्या एका मुनीम आणि संबंधित चालक यांच्यातील कथित संभाषणात एफआयआर झालाच नाही, मालक सगळं निपटून घेईल अशा स्वरूपाचे संवाद असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकरणात पुरावे दडपण्याचा किंवा जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न झाला का?, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, या घटनेनंतर कन्स्ट्रक्शन साईटवरील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेले नियम पाळले गेले का? संबंधित कंपनीकडून सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या होत्या का? अपात्र चालकांकडून जड वाहने चालवून घेतली जात होती का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. युवासेना उपजिल्हा-प्रमुख सचिन पाटील यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून, संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कंपनीला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी निवेदनाद्वारे यापूर्वी केली आहे. त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, मानवाधिकार आयोग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडेही तक्रार सादर केली आहे. एका निष्पाप परप्रांतीय मजुराचा जीव गेला, पण खरा दोषी कोण?हा प्रश्न आता संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक शरद घोडके करीत आहेत.

# गोसीखुर्दच्या मुख्यअभियंता पदी अजय दाभाडे यांची नियुक्ती

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता अजय दाभाडे यांची गोसीखुर्द प्रकल्पाच्या मुख्य अभियंता पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.



शासनाने नुकतेच याबाबत आदेश जारी केले आहेत. दाभाडे यांनी यापूर्वी विविध सिंचन प्रकल्पांवर काम केले असून त्यांना प्रशासकीय आणि तांत्रिक अनुभव आहे.

अजय दाभाडे यांनी नांदेड पाटबंधारे मंडळात अधीक्षक अभियंता म्हणून काम केले आहे. विविध मोठ्या सिंचन प्रकल्पांमध्ये त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. गोसीखुर्द प्रकल्प हा विदर्भातील महत्त्वाचा प्रकल्प मानला जात असून, या प्रकल्पाकडून शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या अपेक्षा जोडल्या गेल्या आहेत. याशिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असणाऱ्या वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाची जबाबदारी ही त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या गतीशील अंमलबजावणीची जबाबदारीही त्यांच्याकडे आहे. नागपूर येथील सिंचन भवनातील कार्यालयात ते सध्या रुजू झाले आहे.

# ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप




उमरी/प्रतिनिधी-वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी खा. ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांचा ७२ वा वाढदिवस स्वाभिमान दिवस म्हणून उमरी तालुक्यात सामाजिक उपक्रमातून उत्साहात साजरा करण्यात आला. वंचित बहुजन आघाडी तालुका उमरीच्या वतीने शहरातील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळे व मिठाईचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे सामाजिक बांधिलकीचा संदेश देत रुग्णांच्या सेवेसाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाला जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष अरुण भद्रे, गंगाधर लांडगे, रामदास शेबरे, के. एन. पवार, युवा आघाडीचे संदेश गायकवाड, आनंदराव पवार, सरपंच बालाजी वाघमारे, मारोती जाधव, शेख रफिक आदी उपस्थित होते. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. रशमा खान, अधिपरिचारिका रेखा पांचाळ तसेच कक्ष सेवक अकबर पठाण यांनीही उपक्रमात सहभाग घेतला.



वाजेगाव शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रात्रं-दिवस रेती तस्करांकडून रेतीचा अवैध उपसा सुरु असून महसूल व पोलीस प्रशासनाकडून सदरील रेती तस्करांवर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही.

# शेतकरी कुटुंबातील साईनाथ तुपेकवाड याने दहावी परीक्षेत मिळविले शंभर पैकी शंभर गुण

भोकर/प्रतिनिधी- तालुक्यातील डौरवाडी येथील माळरानाच्या गावात राहून मच्छीमार व्यवसाय करणाऱ्या, शेतकरी कुटुंबातील बालाजी मिनाजी तुपेकवाड यांचा मुलगा साईनाथ बालाजी तुपेकवाड हा विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत १०० पैकी १००% घेऊन उत्तीर्ण झाल्याबद्धल ग्रामस्थांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला.

भोकर तालुक्यातील डौरवाडी हे छोटेसे गाव माळरानावर असलेले कमी लोकवस्तीचे मात्र या गावातील बालाजी तुपे कवाड हे मच्छीमार व्यवसाय करतात शेतकरी छोटेसे कुटुंब आहे मात्र त्यांनी आपल्या मुलाला चांगले शिक्षण मिळावे म्हणून अहमदपूर येथील रवींद्रनाथ टागोर विद्यालय येथे शिक्षणासाठी ठेवले आपल्या मेहनतीच्या जोरावर जिद्दीने साईनाथ तुपेकवाड ह्याने नुकत्याच झालेल्या दहावी परीक्षेमध्ये सर्वच विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले एकूण ५०० गुण मिळाल्याने ग्रामीण भागातील या विद्यार्थ्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे ह्या यशाबद्दल ग्रामस्थांनी गावाचं नाव



उज्वल केल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार केला ग्रामपंचायत सदस्य बालाजी एलपे यांनी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम आयोजित केला. हनुमान मंदीर येथे, फटाके फोडून आतिषबाजी करून पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी नागोराव काळे, गंपू पाटील जाधव, मारोती रुखाजी तुपेकवाड, संजय आरलवाड, लक्ष्मण पाटील जाधव, आनंदराव पाटील जाधव, शिवाजी काळे, नामदेव जाधव, गणेश काळे, अवधूत जाधव, राजू जाधव यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

# जांब (बु.) येथे विजांच्या गडगडासह पावसाची हजेरी

मुखेड/प्रतिनिधी- तालुक्यातील जांब बुद्रुक व परिसरात वादळी वा-यासह पावसाने हजेरी लावल्यामुळे सर्वसामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे.मुखेड तालुक्यात सध्या लग्नसोहळ्यांची धामधूम सुरू असतानाच शनिवारी दुपारी जांब बु. व परिसरात अचानक वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक बदललेल्या वातावरणामुळे नागरिकांची तसेच विवाह सोहळ्यांसाठी उभारण्यात आलेल्या मंडपांची तारांबळ उडाली.

काही ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे मंडपांचे नुकसान झाले असून, वीजपुरवठाही काही काळ खंडित झाला होता. लग्नसमारंभासाठी आलेल्या पाहुण्यांना पावसापासून बचावासाठी धावपळ करावी लागली. शेतकरी वर्गाने मात्र या पावसाचे स्वागत केले असून, उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त केली आहे. हा आठवडा म्हणजे लग्नसराईचा शेवटचा आठवडा होय. १०,११,१३ व १४ तारीख ही लग्नासाठी शेवटची तारीख होय. १४ तारखेनंतर अधिक महिना सुरू होत असल्याने शेतकरी व व्यापारी वर्ग या महिन्यात लग्न समारंभ करत नसतात. त्यामुळे सध्या सर्वत्र एकच लगीनघाई दिसून येत आहे. सध्या उन्हाचा पारा ४० ते ४५ डिग्री असला तरी लग्न समारंभात खचाखच गर्दी दिसून येत आहे. सर्वांची एकच घाई झाल्यामुळे एसटी बसेस वर प्रचंड गर्दी दिसून येत आहे. सध्या उन्हाळ्यात पावसाळा आणि पावसाळ्यात उन्हाळा अशी परिस्थिती चालू आहे. आजच्या पावसामुळे हवामानातील अचानक बदलामुळे परिसरात काही काळ गारवा निर्माण झाला असून, नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# दहावीत श्रीराम इंदुरकर ९४ टक्के गुण घेवून उत्तीर्ण

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, कुंडलवाडी येथील के. रामल्लू पब्लिक स्कूलचा विद्यार्थी श्रीराम राजेश्वर इंदुरकर याने ९४.४० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



उत्कृष्ट गुणवत्तेमुळे त्याने शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. श्रीरामच्या या यशामुळे शाळेसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच पालकांनी श्रीरामचे कौतुक करत त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# जिल्ह्यात जमावबंदी,शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात १२ मे च्या सकाळी ६ वाजेपासून ते २६ मे २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १२ मे च्या सकाळी ६ वाजेपासून ते २६ मे २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल.त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६

जा क्रं २०२५/जे.मृ.नो./कवी दिनांक १५/०४/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार श्रीमंगले कडाजी मारोती रा.हरबळ प.क. ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या श्रीमंगले कडाजी मारोती रा.हरबळ प.क. ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव श्रीमंगले कडाजी मारोती रा.हरबळ प.क.ता.कंधार या ठिकाणी दिनांक १६/०२/२०२५ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १५/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६

जा क्रं २०२५/जे.मृ.नो./कवी दिनांक १५/०४/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार मोहसीन खान पि खैसर खान रा.कंधार ता. कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या मोहसीन खान पि खैसर खान रा.कंधार ता. कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव मोहसीन खान पि. खैसर खान रा.कंधार ता. कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०१/१९८६ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १५/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६

जा क्रं २०२५/जे.मृ.नो./कवी दिनांक ११/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार शेख साबेर फिरोज रा.हटक्याळ ता. कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्य शेख साबेर फिरोज रा. हटक्याळ ता. कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नावशेख साबेर फिरोज रा. हटक्याळ ता. कंधार या ठिकाणी दिनांक ०५/०५/१९९६ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०८/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६

जा क्रं २०२५/जे.मृ.नो./कवी दिनांक ११/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार शेख समिना फिरोज रा. हटक्याळ ता. कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्य शेख समिना फिरोज रा. हटक्याळ ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नावशेख समिना फिरोज रा. हटक्याळ ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०६/१९९८ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०८/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

# आता घुंगराचा नाद हरवला,शेतात घुमला ट्रॅक्टर अन् रोटरचा आवाज...!





## मजूर टंचाई:शेतकऱ्यांचा यांत्रिकीवर भर,पेरणीपूर्व मशागतीला वेग

देगलूर/प्रतिनिधी-एप्रिल संपूर्ण मे महिन्याची सुरुवात झाली. की शेतशिवारात उन्हाळी मशागतीची लगबग सुरू होते. मात्र देगलूर तालुक्यासह पूर्ण परिसरामध्ये सध्या चित्र बदललेले दिसून येत आहे. एकेकाळी मजुरांच्या गर्दीने फुलणारी शेत आता शांत असून हाताने होणाऱ्या कामांची जागा ट्रॅक्टर आणि रोटरच्या आवाजाने घेतली आहे. वाढते ऊन, मजुरांचा मोठा तुटवडा आणि सालगड्यांचे वाढलेले दर यामुळे शेतकरी नाईलाजामुळे संपूर्णपणे यंत्रावर अवलंबून असल्याचे चित्र आहे.

### सालगड्यांच्या 'अटी आणि शर्ती'

शेतात कायमस्वरूपी काम करणाऱ्या सालगड्यांचा भाव आता दीड ते दोन लाखाच्या पार गेला आहे. एवढे पैसे देऊनही कष्टाची कामे करण्यासाठी तयार नसतात. त्यांच्या विविध अटीमुळे शेतकऱ्याला कामाचे नियोजन करताना मोठी कसरत करावी लागते. महिला मजुरांची उपलब्धता ही कमी झाल्यामुळे पराठ्या उपडणे, व्यसने किंवा काडीकचरा वेचण्याऐवजी आता रोटावेटरचा वापर करून कचरा जमिनीतच बारीक करण्यावर भर दिला जात आहे.

शेतीमध्ये शारीरिक कष्ट करण्याची मानसिकता कमी होत चालल्याने मजुरांचा तुटवडा निर्माण झाला आहे.

### बैल जोडी झाली दुर्मिळ

गुढीपाडव्याचा मुहूर्त साधनपूर्वी शेतात चार सहा बैलांच्या जोड्या नांगरट करताना दिसायच्या. मात्र आता ग्रामीण भागातूनही हे चित्र लोप पावत चालले आहे.बैलाच्या वाढलेल्या किमती त्यांना सांभाळण्यासाठी लागणारा चारा पाणी आणि कष्टाची कामे करण्याची कमी झालेली मानसिकता यामुळे शेतकऱ्यांना बैल जोडी परवडेनाशी झाली आहे.परिणामी नांगरणीपासून ते पेरणी पर्यंतच्या कामासाठी ट्रॅक्टरचाच वापर वाढला आहे.

एकीकडे आपण कृषीप्रधान देश म्हणतो. मात्र शेती कामासाठी मजूर न मिळणे ही कृषी उत्पादनाच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. मुग, उडीद, सोयाबीन, कापूस, हरभरा, तुर, ज्वारी, केळी आणि आले यासारख्या तिघांच्या लागवडीसाठी अद्यापही मजुरांचीच गरज लागते. मात्र मजूर वेळेवर मिळत नसल्याने ही कामे लांबणीवर पडतात. पेरणीनंतरची अंतर मशागत आजही बैलांच्या साह्याने करणे फायदेशीर ठरते,पण बैला अभावी ही कामे वेळेवर होत नाहीत. औ वेळेवर मशागत न झाल्याने पिकांच्या वाढीवर आणि पर्यायाने उत्पादनावर याचा विपरीत परिणाम होतो. समाज माध्यमावर शेतीची कामे सोपी करणारी अनेक यंत्रे शेतकऱ्यांना खुणावत आहेत. ते पाहून कामे सोपी होतील असे वाटते. यामुळे ऐन हंगामात कांमे खोळंबतात. आणि त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होताना दिसत आहे.

# सोयाबीन,कापुस संपला आणि भाव वाढले;हे सरकार शेतकऱ्यांचे की,व्यापाऱ्यांचे?

**वैशपाल कांबळे**

मांडवी-शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेला कापूस आणि सोयाबीन जेव्हा विक्रीसाठी बाजारात होता, तेव्हा त्याला कवडीमोल भाव मिळाला. मात्र, आता शेतकऱ्यांकडचा साठा संपताच कापूस १० हजार आणि सोयाबीन ७ हजार रुपयांच्या घरात पोहोचले आहे. यावरून हे शासन नक्की शेतकऱ्यांचे आहे की व्यापाऱ्यांचे? असा संतप्त सवाल मांडवी परिसरातील शेतकरी विचारत आहेत.



यावर्षीच्या हंगामात शेतकऱ्यांना निसर्गासोबतच बाजारभावाचाही मोठा फटका बसला. बाजारात माल येताच भाव पाडण्याचे सत्र सुरू झाले होते. हंगामात सोयाबीनला केवळ ३ हजार ५०० ते ४ हजार रुपये भाव मिळाला तर कापसाचे दरही ६ हजार ते ७ हजार रुपयांपर्यंत मर्यादित राहिले. शेतकऱ्यांनी कर्ज फेडण्यासाठी आणि घरखर्चासाठी आपला संपूर्ण सोयाबीन व कापुस याच दरात विकून टाकला, आता शेतकऱ्याच्या हाती फक्त निराशा उरली. जेव्हा सामान्य शेतकऱ्याकडे विक्रीसाठी एक दाणा सोयाबीन आणि एक बोन्ड कापुस शिल्लक नाही, तेव्हा बाजारपेठेत अचानक तेजी आली आहे. कापूस १० हजार रुपये प्रति क्विंटल, सोयाबीन ७ हजार रुपये प्रति क्विंटल वधारला आहे. आम्ही रात्रंदिवस राबून पीक घेतो, पण भाव ठरवण्याची वेळ येते तेव्हा शासन आणि व्यापारी संगनमत करून भाव पाडतात. आता माल व्यापाऱ्यांच्या गोदामात जमा झाल्यावर भाव वाढवून कोणाचे भले केले जात आहे? असा सवाल मांडवी परिसरातील संतप्त शेतकरी करीत आहेत. या तफावतीमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून, शेतमालाचे भाव वाढवताना ते हंगामाच्या सुरुवातीलाच का वाढवले जात नाहीत?, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठी राबवले जाणारे धोरण थांबवून शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा अधिक संरक्षण मिळावे, अशी मागणी आता जोर धरत आहे.




हज यात्रेसाठी जाणाऱ्या फारुख बेग व त्यांच्या कुटुंबियांचा संतोष मुळे यांनी शाल व पुष्पहार घालून सत्कार केला. यावेळी आनंद पावडे, मुब्बशिर बेग, मो.अफसर पाशा, महंमद जुबेर, नागराज मुळे, विश्वनाथ पावडे, राम भायेगावकर, निरंजन मोरे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोकअदालतीत २१ प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा

किनवट/प्रतिनिधी-किनवट न्यायालयात (९ मे) पार पडलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत बँकेच्या ११ व इतर दिवाणी स्वरूपाच्या १७ प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा करण्यात आला. या प्रक्रियेत बँकेच्या प्रकरणातून ७ लाख, ८५ हजार ५०० व न्यायालयीन प्रकरणातून २ लाख, ११ हजार १२३ रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती न्यायालय प्रशासनाने दिली.



राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे परस्पर संमतीने मिटविण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे संबंधित पक्षकारांचा वेळ, पैसा आणि न्यायालयीन प्रक्रियेतील त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला असून अनेकांना दिलासा मिळाला आहे.या लोक अदालतीत पॅनल प्रमुख म्हणून दिवाणी न्यायाधीश पी.एम. माने तसेच पॅनल सदस्य म्हणून ॲड. दीपा सोनकांबळे यांनी काम पाहीले. यावेळी सहदिवाणी न्यायाधीश के.जी. मेंढे यांची उपस्थिती होती. न्यायालयातील वकिलांनी प्रकरणे निकाली काढण्यासाठी सहकार्य केले.

# नरसी चौकात चार तास वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त

नायगाव/प्रतिनिधी-रामतीर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नरसी चौरस्ता येथे वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दि.१० मे रोजी नरसी चौकात तब्बल चार ते पाच तास वाहतूक खोळंबल्याने नागरिक, वाहनधारक तसेच लग्नसमारंभासाठी जाणाऱ्या अनेक वऱ्हाडांना मोठा त्रास सहन करावा लागला.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मागील वर्षी ग्रामपंचायत प्रशासन आणि रामतीर्थ पोलीस स्टेशनचे तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी संयुक्त कारवाई करत नरसी परिसर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणमुक्त केला होता. त्या काळात चौकातील वाहतूक सुरळीत झाली होती. मात्र त्यांची तडकाफडकी बदली झाल्यानंतर रामतीर्थ पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांची नियुक्ती करण्यात आली. नागरिकांचा आरोप आहे की, सध्याच्या काळात अतिक्रमणावर प्रभावी कारवाई होत नसल्याने पुन्हा रस्त्याच्या कडेला फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, ज्यूस सेंटर आणि हातगाडीधारकांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नरसी चौरस्त्यावर दररोज वाहतूक कोंडी होत असून आजची परिस्थिती अधिक गंभीर होती. काही स्थानिकांकडून असेही बोलले जात आहे की, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे हे नरसी पोलीस चौकीला नियमित भेट देत नसल्याने स्थानिक पातळीवरील वाहतूक व अतिक्रमण नियंत्रणावर परिणाम होत आहे. तसेच रामतीर्थ पोलीस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांवर प्रभावी नियंत्रण नसल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामपंचायत आणि पोलीस प्रशासन यांनी संयुक्त मोहीम राबवून नरसी चौरस्ता पुन्हा अतिक्रमणमुक्त करावा तसेच वाहतूक व्यवस्थापनासाठी सक्षम आणि कठोर प्रशासनाची गरज असल्याची मागणी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-एमआयडीसी भागातील आदित्य वजन काट्या जवळ सुरु असलेल्या जुगार अड्डयावर रविवारी दुपारी पोलीसांनी धाड टाकुन १ लाख ३ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. आदित्य वजन काट्या जवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पो.नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून जुगार खेळत असतांना विलास गजभारे व इतर तीन अशा चार जणांना पोलीसांनी अटक केली आहे.

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणी १८ महिन्यांनंतर अंगरक्षक बडतर्फ

मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात तब्बल दीड वर्षानंतर मोठी प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. बाबा सिद्दीकी यांच्या सुरक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेले पोलीस हवालदार श्याम मगन सोनावणे यांना कर्तव्यात बेजबाबदारपणा आणि निष्काळजीपणा केल्याच्या आरोपावरून सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. मुंबई पोलिसांच्या संरक्षण आणि सुरक्षा विभागाने ही कारवाई केली असून, या निर्णयामुळे पोलीस दलातही खळबळ उडाली आहे.

वांद्रे पूर्वेतील निर्मल नगर परिसरात दि.१२ ऑक्टोबर २०२४ रोजी बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता. पुत्र झीशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाबाहेर झालेल्या या हल्ल्यात त्यांच्या छातीला गंभीर दुखापत झाली होती. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. या हत्येमागे गँगस्टर अनमोल बिश्नोई याचा हात असल्याचे तपासात समोर आले होते. या प्रकरणात आतापर्यंत २७ आरोपींना मोक्का अंतर्गत अटक करण्यात आली आहे.घटनेच्या वेळी श्याम सोनावणे हे बाबा सिद्दीकी यांचे अधिकृत अंगरक्षक म्हणून तैनात होते. मात्र हल्ल्यावेळी त्यांनी योग्य प्रतिसाद दिला नाही, हल्लेखोरांना रोखण्याचा प्रयत्न केला नाही किंवा तत्काळ कारवाई केली नाही, असा गंभीर ठपका विभागीय चौकशीत ठेवण्यात आला. घटनेनंतर अवघ्या सहा दिवसांत म्हणजे १८ ऑक्टोबर २०२४ रोजी सोनावणे यांना निलंबित करण्यात आले होते. या प्रकरणी नेमण्यात आलेल्या विभागीय चौकशीत त्यांना दोषी ठरविण्यात आले. या गंभीर त्रुटीमुळेच अखेर संबंधित अंगरक्षकावर कठोर कारवाई करण्यात आल्याचे पोलीस सुत्रांनी सांगितले.

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधिश,कनिष्ठ स्तर,अर्धापूर यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज (आर.जे.ई) क्रमांक ८५/२०२६
या प्रकरणातील

अर्जदार क्र.: तीर्थाबाई भ्र.सुगंदा सोनाळे, वय : ४३ वर्षे, धंदा : घरकाम, रा.लोणी (बु.) ता.अर्धापूर जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

विषय : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत सखाराम पि. सुगंधराव सोनाळे यांचे अर्जदार हि आई आहे. मयत सखाराम पि. सुगंधराव सोनाळे यांचा मृत्यू दिनांक : १९/०५/२०१६ रोजी झाला. रा.लोणी खु. ता.अर्धापूर जि.नांदेड

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांस सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दि.२२/६/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होवून नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक : ५/५/२०२६ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
अर्धापूर

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर,अर्धापूर

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६
जा क्रं २०२५/जे.मृ.नो./कवी दिनांक ११/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार शेख सुहाना फिरोज रा. हटक्याळ ता. कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्य शेख सुहाना फिरोज रा. हटक्याळ ता. कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नावशेख सुहाना फिरोज रा. हटक्याळ ता. कंधार या ठिकाणी दिनांक २०/०७/२००२ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०८/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

पान १ वरुन

### जबाबदारीने वागणे...

नेत्यांकडून करण्यात आला. जागतिक संकटाच्या काळात सर्वांनी एकत्र येण्याची गरज असताना विरोधक केवळ राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे भाजप नेत्यांनी म्हटले.

### सत्ताधारी-विरोधक...

इंस्टाग्राम, एक्स आदी समाज माध्यमांवर प्रतिक्रियांचा अक्षरशः पूर आला आहे. वेगवेगळे मिम्स वापरुन परस्पर विरोधी प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. कोणी पंतप्रधानांनी स्वतः आधी सुरुवात करावी, नंतर देशवासीयांना काटकसरीचे धडे द्यावेत तर कोणी प्रत्येक गोष्टीत राजकारण आणु नये पंतप्रधान देशहितासाठीच बोलले अशा भावना समाज माध्यमांवर व्यक्त होत आहेत. काही तीव्र भावना देखील व्यक्त होत आहेत.

### ही तर अपयशाची...

समर्थन दिले असून, तर काहींनी सरकारच्या आर्थिक धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळे आगामी काळात इंधनदर, महागाई आणि ऊर्जा संकटाच्या मुद्द्यावरून देशातील राजकारण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

### युद्धाच्या पार्श्वभूमीवर...

उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी सरकारने विविध पर्यायी व्यवस्थांची तयारी सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली.बैठकीनंतर राजनाथसिंह यांनी सांगितले की, पश्चिम आशियातील घडामोडींवर केंद्र सरकार बारकाईने लक्ष ठेवून आहे. देशातील ऊर्जा पुरवठा आणि अत्यावश्यक वस्तूंची उपलब्धता कायम राहावी यासाठी सर्व संबंधित विभाग समन्वयाने काम करत आहेत.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशवासीयांना इंधन बचतीचे आवाहन केले आहे. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे, कारपूलिंगला प्रोत्साहन देणे, मालवाहतुकीसाठी रेल्वेचा अधिक वापर करणे आणि इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार वाढवणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.जागतिक अस्थिरतेच्या काळात देशाची आर्थिक स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी नागरिकांनी जबाबदारीने वागण्याची गरज असल्याचेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४